2 3 DEC 2025

जनसंपर्क कक्ष

सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त समारंभानिमित्त आज ग्रंथदिंडी

## विद्यापीठात ग्रंथमहोत्सवाला होणार प्रारंभ; विविध सांस्कृतिक कार्यक्रम



शिवाजी विद्यापीठ : ६२ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित दोनदिवसीय ग्रंथमहोत्सवासाठी मंडप आणि अन्य सुविधा उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभ सोहळ्याला मंगळवारी (ता. २३) ग्रंथदिंडीने प्रारंभ होत असून, ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. विश्वविक्रमी कविता सादरकर्ते विसुभाऊ बापट यांचा 'कुटुंब रंगलंय काव्यात' हा प्रयोग सादर होणार आहे. ग्रंथमहोत्सवासाठीची तयारी पूर्ण झाली असून, बुधवारी (ता. २४) सकाळी अकरा वाजता होणाऱ्या दीक्षान्त समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

दीक्षान्त समारंभानिमित्त दरवर्षीप्रमाणे मंगळवारी सकाळी साडेसात वाजता प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते कमला महाविद्यालयात ग्रंथदिंडीचे उद्‌घाटन होईल. तेथून जनता बझार, राजारामपुरी मुख्य मार्ग, आईचा पुतळा, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठ गेट क्रमांक सहा मार्गे दिंडी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात दीक्षान्त सभामंडपात येईल आणि तेथे दिंडीचे विसर्जन होईल. त्यानंतर सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या अॅनेक्स इमारत परिसरात आयोजित ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन होईल.

यंदा ग्रंथमहोत्सवात नामवंत प्रकाशक, विक्रेते यांचे एकूण ४० स्टॉल असून, त्यापैकी पुस्तकांचे १९, तर खाद्यपदार्थ व अन्य वस्तू, पदार्थांचे १० स्टॉल असतील. दुपारी बारा ते दोन या वेळेत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या कलाकार विद्यार्थ्यांकडून 'महाराष्ट्राची लोकधारा' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर होईल. सायंकाळी पाच वाजता विसूभाऊ बापट यांचे विश्वविक्रमी 'कुटुंब रंगलंय काव्यात' हे एकपात्री काव्य सादरीकरण होईल.

### वन्यजीव संवर्धनाचा जागर

ग्रंथमहोत्सवात यंदा प्रथमच वन्यजीव संवर्धन विभागाचेही दोन स्टॉल असणार आहेत. त्याद्वारे वन्यजीव संवर्धनाचा जागर आणि आवाहन केले जाणार आहे. ग्रंथमहोत्सव मंगळवारी आणि बुधवारी सकाळी नऊ ते रात्री नऊ या वेळेत सुरू राहील. ग्रंथमहोत्सवासाठी मंडप उभारणीसह सर्व कामे पूर्ण झाली असल्याची माहिती बॅ. खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.

2 3 DEC 2025 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आजपासून दीक्षान्त समारंभ

## ग्रंथदिंडी व ग्रंथोत्सवाचे आयोजन; ज्येष्ठ संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी प्रमुख पाहुणे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ बुधवार (दि. २४) रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. मंगळवारपासून ग्रंथदिंडी व ग्रंथमहोत्सवाने दीक्षांत समारंभास प्रारंभ होणार आहे. विद्यापीठातर्फे समारंभाची तयारी पूर्ण झाली आहे.

दीक्षान्त समारंभास भारताचे संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे आहेत. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची उपस्थिती असणार आहे. यंदाच्या दीक्षान्त समारंभात ४९ हजार ९०२ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत.

समारंभात राज्यशास्त्र अधिविभागाचा विद्यार्थी अक्षय नलवडे-जहागीरदार यांना विद्यापीठाचे राष्ट्रपती व मानसशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल आर्या देसाई (हुपरी) यांना कुलपती सुवर्णपदक प्रदान केले जाणार आहे.



कोल्हापूर : दीक्षान्त समारंभासाठी उभारण्यात येत असलेला भव्य मंडप. (छाया : अर्जुन टाकळकर)

### आज ग्रंथदिंडीचे उद्घाटन

मंगळवारी सकाळी ७.३० वाजता कमला महाविद्यालयात प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन होईल. १० वाजता कुलगुरूंच्या हस्ते विद्यापीठाच्या ॲनेक्स इमारत प्रांगणात ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. दुपारी १२ ते २ या वेळेत 'महाराष्ट्राची लोकधारा' कार्यक्रम होईल. सायंकाळी ५ वाजता कवी विसूभाऊ बापट यांचे 'कुटुंब रंगलंय काव्यात' सादर होईल.

23 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# ग्रंथदिंडीने होणार दीक्षांत समारंभाला प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठात आज ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन : सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

प्रतिनिधी
कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभ सोहळ्याला आज ग्रंथदिंडीने प्रारंभ होत आहे. सकाळी ८ वा. कमला कॉलेज येथून ग्रंथीदंडीला प्रारंभ होईल. यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात सकाळी साडेदहा वा. ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.**

विश्वविक्रमी कविता सादरकर्ते विसूभाऊ बापट यांचा 'कुटुंब रंगलंय काव्यात' हा प्रयोग सादर होणार असून विद्यार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार असल्याची माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.



**कोल्हापूर : ग्रंथमहोत्सव व दीक्षांत समारंभासाठी मंडप व अन्य सुविधा उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.**

ग्रंथमहोत्सवासाठीची तयारी पूर्ण झाली असून बुधवार, दि. २४ रोजी होणाऱ्या दीक्षांत समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभानिमित्त दरवर्षीप्रमाणे, आज सकाळी ८ वा. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते कमला महाविद्यालयात ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार आहे. तेथून जनता बझार, राजारामपुरी मुख्य मार्ग, आईचा पुतळा, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठ गेट क्र. ६ या मार्गे दिंडी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात दीक्षांत सभामंडपात येईल आणि तेथे दिंडीचे विसर्जन होईल.

यानंतर सकाळी साडेदहा वा. कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते विद्यापीठाच्या अनेक्स इमारत परिसरात आयोजित ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. यंदा ग्रंथमहोत्सवात नामवंत प्रकाशक, विक्रेते यांचे एकूण ४० स्टॉल असून त्यापैकी पुस्तकांचे १९ तर, खाद्यपदार्थ व अन्य वस्तू पदार्थांचे १० स्टॉल असणार आहेत. ग्रंथमहोत्सवात यंदा प्रथमच वन्यजीव संवर्धन विभागाचेही २ स्टॉल असणार आहेत. ग्रंथमहोत्सव २३ व २४ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत सुरू राहणार आहेत. ग्रंथ महोत्सवासाठी मंडप उभारणीसह सर्व कामे पूर्ण झाली आहेत.

दुपारी १२ ते २ या वेळेत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या कलाकार विद्यार्थ्यांकडून 'महाराष्ट्राची लोकधारा' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

सायंकाळी ५ वा. प्रख्यात कवी विसूभाऊ बापट यांचे विश्वविक्रमी 'कुटुंब रंगलंय काव्यात' या सुप्रसिद्ध एकपात्री काव्याचे सादरीकरण होणार आहे. सर्व कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य व खुला आहे. कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पोलीस बंदोबस्त

यंदाचा शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ उद्या दि. २४ रोजी होत आहे. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संरक्षण मंत्रालयाचे वैज्ञानिक सल्लागार व अध्यक्ष डॉ. जी सतिश रेड्डी उपस्थित राहणार आहेत. उपस्थितांना ते मार्गदर्शन करतील. कार्यक्रमस्थळी बैठक व्यवस्था, मंडप, कार्यक्रमस्थळी जाण्याच्या मार्गावर मंडप, व्यासपीठ तयारी सुरू असून याचे काम आज पूर्ण होणार आहे. कार्यक्रमस्थळी होणारी गर्दी लक्षात घेवून त्यादृष्टीने नियोजन केले जात आहे. यावेळी सुरक्षेसाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 DEC 2025


जनप्रवास

# दीक्षांत समारंभानिमित्त आज ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन

## बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांची माहिती

**जनप्रवास :** कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभ सोहळ्याला मंगळवारी (दि. २३) ग्रंथदिंडीने प्रारंभ होत आहे. ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन आणि सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत. विश्वविक्रमी कविता सादरकर्ते विसूभाऊ बापट यांचा 'कुटुंब रंगलंय काव्यात' हा प्रयोग सादर होईल. ग्रंथमहोत्सवासाठीची तयारी पूर्ण झाली असून बुधवारी (दि. २४) सकाळी होणाऱ्या दीक्षांत समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. ही माहिती समन्वयक तथा बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवासाठी मंडप व अन्य सुविधा उभारणीचे काम पूर्ण.**

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त दरवर्षीप्रमाणे मंगळवारी (दि. २३) सकाळी ७.३० वाजता कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते कमला महाविद्यालयात ग्रंथदिंडीचे उद्घाटन होईल. तेथून जनता बझार, राजारामपुरी मुख्य मार्ग, आईचा पुतळा, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठ गेट क्र. ६ या मार्गे दिंडी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात दीक्षांत सभामंडपात येईल आणि तेथे दिंडीचे विसर्जन होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते विद्यापीठाच्या अनेक्स इमारत परिसरात आयोजित ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. यंदा ग्रंथमहोत्सवात नामवंत प्रकाशक, विक्रेते यांचे एकूण ४० स्टॉल असून त्यापैकी पुस्तकांचे १९ तर, खाद्यपदार्थ व अन्य वस्तू, पदार्थांचे १० स्टॉल असतील. ग्रंथमहोत्सवात यंदा प्रथमच वन्यजीव संवर्धन विभागाचेही २ स्टॉल असणार आहेत. ग्रंथमहोत्सव २३ व २४ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत सुरू राहतील. ग्रंथमहोत्सवासाठी मंडप उभारणीसह सर्व कामे पूर्ण झाली आहेत. त्यानंतर दुपारी १२ ते २ या वेळेत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या कलाकार विद्यार्थ्यांकडून 'महाराष्ट्राची लोकधारा'हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर होईल. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता प्रख्यात कवी विसूभाऊ बापट यांचे विश्वविक्रमी 'कुटुंब रंगलंय काव्यात' हे सुप्रसिद्ध एकपात्री काव्य सादरीकरण होईल. हा कार्यक्रम सर्वांना विनामूल्य खुला राहील.

23 DEC 2025

लोकमत

# दीक्षांत समारंभास आज ग्रंथदिंडीने प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२व्या दीक्षांत समारंभ सोहळ्याला मंगळवारी ग्रंथदिंडीने प्रारंभ होत आहे. ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन, सांस्कृतिक कार्यक्रमही तसेच विसूभाऊ बापट यांचा 'कुटुंब रंगलंय काव्यात' याचा प्रयोगही होणार आहे. बुधवारी (दि. २४) सकाळी होणाऱ्या दीक्षांत समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. ही माहिती समन्वयक डॉ. धनंजय सुतार आणि डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.

2 3 DEC 2025

जनप्रवास

# विद्यापीठात आज सांस्कृतिक कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ बुधवार, २४ डिसेंबर रोजी आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने मंगळवार, २३ रोजी सकाळी १२ वाजता महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रम विद्यार्थी विकास विद्यापीठ संघ सादर करणार आहे. सायंकाळी ५ वाजता मुंबईतील विसुभाऊ बापट कुटुंब रंगलंय काव्यात एकपात्री काव्यनाट्यानुभव सादर करणार आहेत. तरी या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

2 3 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीमध्येही मुलीच अव्वल

## दीक्षांत समारंभात ९८८५ प्रत्यक्ष तर १८६२८ पोस्टाने पदवी प्रमाणपत्र स्वीकारणार

**जनप्रवास : अहिल्या परकाळे,**

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेवेळी शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या फारच कमी होती. परंतू अलीकडे पालकांच्या प्रोत्साहनामुळे उच्च शिक्षणात मुलींचा टक्का वाढत आहे. एम. फिल., पीएच. डी.सह संशोधनासाठी मुली परदेशातही जात आहेत. यंदाही ५७ टक्के मुली पदवी प्रमाणपत्र स्वीकारणार आहेत. त्यामुळे दहावी-बारावीप्रमाणे उच्च शिक्षणासह संशोधनातही मुलीच अव्वल असल्याचे चित्र आहे.

सुरुवातीला स्त्री म्हटल की, चुल आणि मूल अशी संकल्पना होती. मात्र, ही संकल्पना सावित्रीबाई फुले यांनी मोडीत काढत स्त्री शिक्षणासाठी केलेले प्रयत्न खऱ्या अर्थाने सत्यात उतरल्याचे चित्र दिसत आहे. सर्वच क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटवला असून उच्च शिक्षण घेण्यात मुली मुलांपेक्षा एक पाऊल पुढे आहेत. पालकही मुलींना उच्च शिक्षण देण्यासाठी प्रोत्साहीत करत आहेत. त्यामुळे पदवी व पदव्युत्तरचे शिक्षण घेण्यात मुलीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.



मुलींचे पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. पदवी झाल्यानंतर अनेक मुली एम. बी. ए., एम. ए., एम. टेक., एम. एस्सी., एम.सी.ए., एम. लॅब., एम.एस.डब्लू, विधी विभागात पदव्युत्तरचे शिक्षण घेतात. त्यामुळे यंदा पदवी पदवीव्युत्तर आणि पीएच. डी. प्रमाणपत्र घेण्यात शिवाजी विद्यापीठात मुलीच अव्वल असल्याचे दिसते. तसेच संशोधन करण्यासाठी परदेशात जाणाऱ्या मुलींचाही टक्का वाढला आहे. संशोधनानंतर, पेटंट, स्टार्टअप सुरू करण्यातही मुलींचा टक्का वाढला आहे. तसेच स्टार्टअप करणाऱ्या मुलींना आख्ख कुटुंब मदत करीत असल्याचे दिसून येते.

### मुलींच्या गुणवत्तेचा टक्काही वाढतोय

मुली लक्ष देऊन अभ्यास करतात. त्यामुळे उत्तीर्णतेचे प्रमाण मुलींचेच जास्त आहे. गतवर्षीपेक्षा यंदाही मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त आहे. गुणवत्तेतही मुली असल्याने बहुतांश विषयांमध्ये प्रथम क्रमांकही मुलींनीच मिळवला आहे. त्यामुळे प्रथक क्रमांकाचे बक्षीस देऊन मुलींनाच गौरवण्यात येणार आहे.

**- डॉ. अजितसिंह जाधव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ**

### • पदवी, पदव्युत्तरसह संशोधनात मुलींचा टक्का वाढतोय

आपली मुलगी स्वतःच्या पायावर उभी राहावी, आत्मनिर्भर बनावी यासाठी पालक प्रयत्नशील आहेत. दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या आणि आंतरविद्याशाखा या चार विद्याशाखांमध्ये ४९ हजार ९०२ मुले-मुली पदवी प्रमाणपत्र स्वीकारले जाणार आहेत. यामध्ये २८ हजार ९०२ विद्यार्थिनी तर २१ हजार विद्यार्थ्यांची संख्या आहे. आतापर्यंत राष्ट्रपती सुवर्णपदक व कुलपती सुवर्णपदकावरही मुलींनीच आपले नाव कोरले आहे. पालकांचे सहकार्य, शिक्षणाची आवड आणि प्राध्यापकांचे सहकार्य असल्याने मुली प्रत्येक क्षेत्रात अव्वल आहेत. प्रत्येक क्षेत्रात कार्यरत मुलींचा टक्काही वाढत आहे.

### पदवी प्रमाणपत्र स्वीकारणारे विद्यार्थी

| अधिविभागाचे नाव | प्रत्यक्ष मुले | मुली |
|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | २८५३ | ३५३१ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | १९०० | ३५९६ |
| मानव्यविद्या | १२७३ | २२६७ |
| आंतरविद्याशाखा | २४८ | ४९१ |
| एकूण | ६२७४ | ९८८५ |

| अधिविभागाचे नाव | पोस्टाने मुले | मुली |
|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ७४३४ | ६५०१ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ४४३१ | ७०७५ |
| मानव्यविद्या | २८४८ | ४१६३ |
| आंतरविद्याशाखा | ४०२ | ८८९ |
| एकूण | १५११५ | १८६२८ |

2 3 DEC 2025
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेतील २३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील २३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. आजअखेर २२२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. विविध ५८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १४३ परीक्षा केंद्रावर सोमवारी पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ९ हजार ४७७ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेसाठी विद्यापीठाने गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून सोमवारी कोल्हापूर १ व सांगली ५ अशा एकूण ६ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आलेली आली.

2 3 DEC 2025

जनप्रवास

# विद्यापीठ अंतर्गत २२२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी ५८ विषयांची १४३ परीक्षा केंद्रावर परीक्षा झाली. ९ हजार ४७७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. भरारी पथकाकडून कोल्हापूर १, सांगली ५ अशा ६ गैरप्रकारांची नोंद झाली आहे. तसे आत्तापर्यंत २२२ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

23 DEC 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ : २२२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर २२२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयांत सध्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बीए, बीव्होक, बीएस्सी, एमए, एमएसडब्ल्यू, एमसीए, बीटेक, बीई, बॅचलर ऑफ लॉ, हायर डिप्लोमा इन रशियन लँग्वेज, डिप्लोमा इन जापनीज लँग्वेज आदी ५८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १४३ केंद्रांवर झाल्या. परीक्षेला ९ हजार ४७७ विद्यार्थी उपस्थित होते. दि. २२ रोजी बॅचलर ऑफ डिझाईन, पीजी डिप्लोमा इन न्यूट्रीशन, बीव्होक, एमए (अर्थशास्त्र), एमएस्सी (इलेक्ट्रॉनिक्स) आदी २३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

2 3 DEC 2025 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॅमेरा तंत्रा'वर आज विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये उद्या मंगळवारी कॅमेरा तंत्र या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. कॅमेरा तज्ज्ञ सुधीर बोरनाक कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने आयोजित ही कार्यशाळा अध्यासनाच्या इमारतीत सकाळी साडेदहा वाजता सुरू होणार असून, ती सर्वांसाठी खुली आहे. कॅमेऱ्याबाबत कुतूहल असणाऱ्यांनी कार्यशाळेला उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

23 DEC 2025
पुढारी

# ‘कॅमेरा तंत्र’ विषयावर आज विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने ‘कॅमेरा तंत्र’ या विषयावर मंगळवारी (दि. २३) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. कार्यशाळेत कॅमेरा तज्ज्ञ सुधीर बोरनाक कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. ही कार्यशाळा अध्यासनाच्या इमारतीत सकाळी साडेदहा वाजता सुरू होईल. कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून, कॅमेऱ्याबाबत कुतूहल असणाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

2 3 DEC 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## ६२ वा दीक्षांत समारंभ
## विद्यार्थ्यासाठीची अधिसूचना

१) विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात बुधवार दि. २४ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. जी. सतिश रेड्डी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य, आंध्र प्रदेश शासनाचे सन्माननीय सल्लागार, माजी अध्यक्ष डीआरडीओ आणि माजी सचिव, संरक्षण विभाग (संशोधन व विकास ) संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार आणि अध्यक्ष, ॲरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया हे उपस्थित राहणार आहेत.

२) दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढऱ्या रंगाचा शर्ट (पुरुषांसाठी) तर पांढऱ्या/मोती रंगाची जरीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

३) विद्यापीठ परिसरात विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी फोटो काढत असताना फक्त विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या मानवस्त्राचा वापर करुन फोटो काढावेत. अन्य कोणत्याही प्रकारचे गाऊन व टोपीचा वापर करु नये.

४) दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मानवस्त्राची परतावा अनामत रक्कम रु. ६५०/- आणि भाडे ना परतावा रु. २५/- आकारण्यात येणार आहे.

५) ज्या विद्यार्थ्यांनी टपालाव्दारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प अर्ज भरताना निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.

६) सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयांतील ज्या विद्यार्थ्यांनी, अर्ज भरताना In person असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवीप्रमाणपत्रे, विद्यापीठामध्ये दीक्षांत समारंभा दिवशी सकाळी ७:३० ते ११:०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्रं. २ या ठिकाणी वितरण व्यवस्थेव्दारे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/ पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करावीत.)

७) ६२ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या, पीएच.डी. व पारितोषिक प्राप्त स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/62convocation) या सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

८) पदवीप्रमाणपत्र क्रमांक माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर दिलेल्या लिंकचा व दिलेल्या क्युआर कोडचा वापर करावा. (खालील QR कोड स्कॅन करावा प्राप्त लिंकवर क्लिक करून आपला मोबाईल नंबर अथवा PRN नंबर टाकून पदवी प्रमाणपत्र क्रमांक व बुथ क्रमांक प्राप्त करून घेता येईल.)

link---https://studentapps.unishivaji.ac.in/findbooth/

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि. २३ डिसेंबर, २०२५

2 3 DEC 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ६२ वा दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठीची अधिसूचना

१) विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात बुधवार दि. २४ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. जी. सतिश रेड्डी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य, आंध्र प्रदेश शासनाचे सन्माननीय सल्लागार, माजी अध्यक्ष डीआरडीओ आणि माजी सचिव, संरक्षण विभाग (संशोधन व विकास ) संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार आणि अध्यक्ष, अॅरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया हे उपस्थित राहणार आहेत.

२) दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढऱ्या रंगाचा शर्ट (पुरुषांसाठी) तर पांढऱ्या/मोती रंगाची जरीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

३) विद्यापीठ परिसरात विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी फोटो काढत असताना फक्त विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या मानवस्त्राचा वापर करुन फोटो काढावेत. अन्य कोणत्याही प्रकारचे गाऊन व टोपीचा वापर करु नये.

४) दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मानवस्त्राची परतावा अनामत रक्कम रु. ६५०/- आणि भाडे ना परतावा रु. २५/- आकारण्यात येणार आहे.

५) ज्या विद्यार्थ्यांनी टपालाव्दारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प अर्ज भरताना निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.

६) सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयांतील ज्या विद्यार्थ्यांनी, अर्ज भरताना In person असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवीप्रमाणपत्रे, विद्यापीठामध्ये दीक्षांत समारंभा दिवशी सकाळी ७:३० ते ११:०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्रं. २ या ठिकाणी वितरण व्यवस्थेव्दारे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/ पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करावीत.)

७) ६२ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या, पीएच.डी. व पारितोषिक प्राप्त स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/62convocation) या सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

८) पदवीप्रमाणपत्र क्रमांक माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर दिलेल्या लिंकचा व दिलेल्या क्युआर कोडचा वापर करावा. (खालील QR कोड स्कॅन करावा प्राप्त लिंकवर क्लिक करून आपला मोबाईल नंबर अथवा PRN नंबर टाकून पदवी प्रमाणपत्र क्रमांक व बुथ क्रमांक प्राप्त करून घेता येईल.)

link---https://studentapps.unishivaji.ac.in/findbooth/

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि. २३ डिसेंबर, २०२५

२ 3 DEC 2025 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ६२ वा दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठीची अधिसूचना

१) विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात बुधवार दि. २४ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. जी. सतिश रेड्डी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य, आंध्र प्रदेश शासनाचे सन्माननीय सल्लागार, माजी अध्यक्ष डीआरडीओ आणि माजी सचिव, संरक्षण विभाग (संशोधन व विकास ) संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार आणि अध्यक्ष, ॲरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया हे उपस्थित राहणार आहेत.

२) दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढऱ्या रंगाचा शर्ट (पुरुषांसाठी) तर पांढऱ्या/मोती रंगाची जरीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

३) विद्यापीठ परिसरात विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी फोटो काढत असताना फक्त विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या मानवस्त्राचा वापर करुन फोटो काढावेत. अन्य कोणत्याही प्रकारचे गाऊन व टोपीचा वापर करु नये.

४) दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मानवस्त्राची परतावा अनामत रक्कम रु. ६५०/- आणि भाडे ना परतावा रु. २५/- आकारण्यात येणार आहे.

५) ज्या विद्यार्थ्यांनी टपालाव्दारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प अर्ज भरताना निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.

६) सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयांतील ज्या विद्यार्थ्यांनी, अर्ज भरताना In person असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवीप्रमाणपत्रे, विद्यापीठामध्ये दीक्षांत समारंभा दिवशी सकाळी ७:३० ते ११:०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्रं. २ या ठिकाणी वितरण व्यवस्थेव्दारे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/ पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करावीत.)

७) ६२ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या, पीएच.डी. व पारितोषिक प्राप्त स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/62convocation) या सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

८) पदवीप्रमाणपत्र क्रमांक माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर दिलेल्या लिंकचा व दिलेल्या क्युआर कोडचा वापर करावा. (खालील QR कोड स्कॅन करावा प्राप्त लिंकवर क्लिक करून आपला मोबाईल नंबर अथवा PRN नंबर टाकून पदवी प्रमाणपत्र क्रमांक व बुथ क्रमांक प्राप्त करून घेता येईल.)

link---https://studentapps.unishivaji.ac.in/findbooth/

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि. २३ डिसेंबर, २०२५

2 3 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A"++ Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ६२ वा दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठीची अधिसूचना

१) विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात बुधवार दि. २४ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. जी. सतिश रेड्डी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य, आंध्र प्रदेश शासनाचे सन्माननीय सल्लागार, माजी अध्यक्ष डीआरडीओ आणि माजी सचिव, संरक्षण विभाग (संशोधन व विकास ) संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार आणि अध्यक्ष, ॲरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया हे उपस्थित राहणार आहेत.

२) दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढऱ्या रंगाचा शर्ट (पुरुषांसाठी) तर पांढऱ्या/मोती रंगाची जरीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

३) विद्यापीठ परिसरात विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी फोटो काढत असताना फक्त विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या मानवस्त्राचा वापर करुन फोटो काढावेत. अन्य कोणत्याही प्रकारचे गाऊन व टोपीचा वापर करु नये.

४) दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मानवस्त्राची परतावा अनामत रक्कम रु. ६५०/- आणि भाडे ना परतावा रु. २५/- आकारण्यात येणार आहे.

५) ज्या विद्यार्थ्यांनी टपालाव्दारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प अर्ज भरताना निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर अर्जावरील पत्त्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.

६) सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयांतील ज्या विद्यार्थ्यांनी, अर्ज भरताना In person असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवीप्रमाणपत्रे, विद्यापीठामध्ये दीक्षांत समारंभा दिवशी सकाळी ७:३० ते ११:०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्रं. २ या ठिकाणी वितरण व्यवस्थेव्दारे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/ पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करावीत.)

७) ६२ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या, पीएच.डी. व पारितोषिक प्राप्त स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/62convocation) या सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

८) पदवीप्रमाणपत्र क्रमांक माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर दिलेल्या लिंकचा व दिलेल्या क्युआर कोडचा वापर करावा. (खालील QR कोड स्कॅन करावा प्राप्त लिंकवर क्लिक करून आपला मोबाईल नंबर अथवा PRN नंबर टाकून पदवी प्रमाणपत्र क्रमांक व बुथ क्रमांक प्राप्त करून घेता येईल.)

link---https://studentapps.unishivaji.ac.in/findbooth/

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि. २३ डिसेंबर, २०२५

23 DEC 2025

The Indian Express

# SHIVAJI UNIVERSITY, Kolhapur

SEARCH-cum-SELECTION COMMITTEE invites

## APPLICATIONS FOR THE POST OF VICE-CHANCELLOR

Applications are invited for the post of Vice-Chancellor of **Shivaji University, Kolhapur,** Maharashtra. The essential qualifications and experience etc. required for the post of Vice-Chancellor are available on the University website, **www.unishivaji.ac.in.**

Interested individuals have to submit a detailed resume in the prescribed format (to a maximum of 50 pages) available on the university website. Institutions /Peers may also nominate suitable candidates. Nominations /Applications have to be sent in the prescribed format (a hard copy as well as a soft copy by E-mail) to the Nodal Officer at the address given below so as to reach on or before **5.00 PM on 27th Jan., 2026.** Applications received after the last date shall not be entertained.

**Prof. S. Saravanan (Nodal Officer)**
Dept. of Mathematics, Bharathiar University,
Coimbatore- 641 046
Contact: nodalofficer.shivaji@gmail.com, 74488 01220

Sd/-

**Date: 23 Dec., 2025**

**CHAIRMAN,**
**SEARCH-cum-SELECTION COMMITTEE**

2 3 DEC 2025
पुढारी

# SHIVAJI UNIVERSITY, Kolhapur

SEARCH-cum-SELECTION COMMITTEE invites

## APPLICATIONS FOR THE POST OF VICE-CHANCELLOR

Applications are invited for the post of Vice-Chancellor of **Shivaji University, Kolhapur,** Maharashtra. The essential qualifications and experience etc. required for the post of Vice-Chancellor are available on the University website, **www.unishivaji.ac.in.**

Interested individuals have to submit a detailed resume in the prescribed format (to a maximum of 50 pages) available on the university website. Institutions /Peers may also nominate suitable candidates. Nominations /Applications have to be sent in the prescribed format (a hard copy as well as a soft copy by E-mail) to the Nodal Officer at the address given below so as to reach on or before **5.00 PM on 27th Jan., 2026.** Applications received after the last date shall not be entertained.

**Prof. S. Saravanan (Nodal Officer)**
**Dept. of Mathematics, Bharathiar University, Coimbatore - 641 046**
**Contact: nodalofficer.shivaji@gmail.com, 74488 01220**

**Date: 23 Dec., 2025**

**CHAIRMAN,**
**SEARCH-cum-SELECTION COMMITTEE**

डीजीआयपीआर/२०२५/२०२६/४६१२

2 3 DEC 2025
सकाळ




**कोल्हापूर** : खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झालेल्या धिरिजा मोरे, अनुष्का पाटील, कृष्णा सेळके, धैर्यशील भोसले, चिन्मय सूर्यवंशी यांच्यासोबत उपस्थित मार्गदर्शक.

# धिरिजा, अनुष्का, कृष्णासह पाच जणांची खेलो इंडियासाठी निवड

कोल्हापूर, ता. २२ : चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठीय स्पर्धेतून शिवाजी विद्यापीठाचे जलतरणपटू धिरिजा मोरे, अनुष्का पाटील, कृष्णा शेळके, तर पुरुषांमध्ये धैर्यशील भोसले, चिन्मय सूर्यवंशी यांची निवड झाली.

या स्पर्धेत देशभरातील १६९ विद्यापीठांमधील मुले-मुली, असे एकूण ७५० खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेतून या पाच जणांची निवड झाली. खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्रकुलगुरू डॉ. ज्योती जाधव, क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. सुनील खराडे, प्रशिक्षक डॉ. महेश पाटील, सुचय खोपडे, डॉ. राजेंद्र रायकर यांचे मार्गदर्शन लाभले.